सन २०२६-२७ या वित्तीय वर्षाकरीता मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजनेअंतर्गत राज्य शासनाचे सहभाग अनुदान (मार्जिन मनी) वितरीत करणेबाबत.
(अनुसूचित जमाती घटक कार्यक्रम)

महाराष्ट्र शासन
उद्योग, गुंतवणूक, सेवा व खनिकर्म विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- मुरोनि-२०२६/प्र.क्र.१३१/उद्योग-७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २५ ऑगस्ट, २०२६

वाचा:-

१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. योजना-२०१९/प्र.क्र.१२१/उद्योग-७, दिनांक ०१/०८/२०१९.
२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१७७/उद्योग-७, दिनांक ३१/०८/२०१९.
३) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.योजना-२०१९/प्र.क्र.२३०/उद्योग-७, दिनांक २३/०१/२०२०.
४) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. योजना-२०१९/प्र.क्र.१२१/उद्योग-७, दिनांक ११/११/२०२२.
५) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, शासन निर्णय क्र.मुरोनि-२०२४/प्र.क्र.९८/उद्योग-७, दिनांक २१/०५/२०२५.
६) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.आयएलई-२०२३/प्र.क्र.१४२/प्रशासन-३, दिनांक २४/०७/२०२३.
७) उद्योग सह संचालक (मुरोनिका), उद्योग संचालनालय यांचे पत्र क्र. उसं/ मुरोनिका/ अ.ज.प्र.(ST)/ रू.३.००को./ २०२६-२७/अे-७०१, दिनांक ०८/०६/२०२६
८) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.बीयुडी-२०२६/प्र.क्र.९/कार्यासन-६,
९) दिनांक ०५/०८/२०२६.

प्रस्तावना:-

राज्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षित युवक-युवतींची वाढती संख्या व उद्योग, व्यवसाय क्षेत्रात राज्यात विविध क्षेत्रात स्वयंरोजगार व रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होत आहेत. या स्वयंरोजगार व रोजगाराच्या नवीन संधी विचारात घेऊन उद्योजकतेला चालना देणारी व सर्जनशिलतेला कालानुरुप वाव देणारी 'मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम'(CMEGP) ही सर्वसमावेशक योजना दिनांक ०१/०८/२०१९ च्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित करण्यात आलेली आहे. तसेच त्यामध्ये संदर्भाधीन शासन निर्णयान्वये वेळोवेळी आवश्यक सुधारणा करण्यात आल्या आहेत. सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रमुख अंमलबजावणी संस्था (नोडल संस्था) म्हणून उद्योग, गुंतवणूक, सेवा व खनिकर्म विभागाच्या अधिपत्याखालील सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम आयुक्तालय, मुंबई हे कार्यालय आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम आयुक्तालयाच्या अंतर्गत कार्यरत जिल्हा उद्योग केंद्र तसेच महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचेअंतर्गत कार्यरत जिल्हा खादी व ग्रामोद्योग कार्यालय यांच्यामार्फत सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी पूर्णत: ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत आहे.

२. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत राज्यातील युवक-युवतींना स्वयंपूर्ण/आत्मनिर्भर बनविण्याकरीता त्यांना स्वयंरोजगार प्रकल्प स्थापित करण्यासाठी राज्य शासनाकडून अनुदान स्वरुपात आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येईल असे राज्याचे औद्योगिक धोरण-२०१९ मध्ये नमूद केले आहे. त्यानुसार सदर योजनेअंतर्गत सर्वसाधारण घटक व आदिवासी घटकांसाठी निधीची तरतूद करण्यासाठी दिनांक २३/०१/२०२० रोजीच्या शासन

निर्णयान्वये नवीन लेखाशिर्ष उघडण्यात आले आहे. तसेच अनुसूचित जाती प्रवर्गासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून उद्दिष्टांच्या प्रमाणानुसार तरतूद उपलब्ध करून देण्यात येते.

३. सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम आयुक्तालय, मुंबई यांच्याकडून (तत्कालीन उद्योग संचालनालय) संदर्भाधीन दिनांक ०८/०६/२०२६ रोजीच्या पत्रान्वये केलेल्या विनंतीनुसार, सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (अनुसूचित जमाती प्रवर्ग) (२८५१ ६६५४) या कार्यक्रम योजनेंतर्गत मार्जिन मनी वितरणासाठी प्रलंबित प्रस्तावांकरीता रुपये ३ कोटी इतका निधी बीम्स प्रणालीकर वितरणाकरीता उपलब्ध करुन देणेबाबत आदिवासी विकास विभागाला विनंती करण्यात आली होती. त्याअनुषंगाने रुपये १.२ कोटी इतका निधी प्रशासकीय विभागप्रमुख म्हणून प्रधान सचिव (उद्योग, गुंतवणूक व सेवा) यांना वितरीत करण्यास आदिवासी विकास विभागाने दिनांक ०५/०८/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. सदर वस्तुस्थिती विचारात घेता, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (अनुसूचित जमाती प्रवर्ग) योजनेंतर्गत मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतून मार्जिन मनी म्हणून वितरणाकरीता उपलब्ध करुन दिलेल्या रुपये १.२ कोटी इतक्या अनुदानाच्या खर्चास मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

आदिवासी विकास विभागाने आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजनेसाठी सन २०२६-२७ च्या आर्थिक वर्षाच्या तरतूदीतून रुपये १,२०,००,०००/- (रुपये एक कोटी वीस लक्ष फक्त) इतका निधी प्रशासकीय विभाग म्हणून प्रधान सचिव (उद्योग, गुंतवणूक व सेवा) यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर (BEAMS) वितरीत व खर्च करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर प्रयोजनार्थ रुपये १,२०,००,०००/- (रुपये एक कोटी वीस लक्ष फक्त) इतक्या अनुदानाच्या खर्चास या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर अनुदानाची रक्कम आहरण व संवितरणाची जबाबदारी ही आयुक्त (सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम), सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम आयुक्तालय, मुंबई यांच्या कार्यालयातील लेखा अधिकारी यांची राहील.

३. ज्या प्रयोजनासाठी निधीची मागणी केली आहे, त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्याची जबाबदारी आयुक्त (सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम), सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम आयुक्तालय, मुंबई यांची राहील.

४. सदर निधी खर्च करण्यापूर्वी विहित कार्यपद्धतीचा अवलंब झाल्याची तसेच अनुज्ञेय असलेल्या बाबींवरच सर्व अटी व शर्तींची पूर्तता झाली असल्याची खातरजमा करण्याची आणि शासकीय अनुदानाच्या सुयोग्य विनियोगावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी आयुक्त (सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम), सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम आयुक्तालय, मुंबई यांची राहील.

५. या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र आयुक्त (सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम), सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम आयुक्तालय, मुंबई यांनी शासनास त्वरीत सादर करावे.

६. आदिवासी विकास विभागाच्या दिनांक ०५/०८/२०२६ रोजीच्या शासन निर्णयातील अटींची पूर्तता करण्याची जबाबदारी आयुक्त (सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम), सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम आयुक्तालय, मुंबई यांची राहील.

७. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९/०४/२०२६ तसेच त्यासोबतच्या परिशिष्टातील तरतुदीनुसार आणि त्याअनुषंगाने सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम आयुक्तालय, मुंबई यांच्याकडून (तत्कालीन उद्योग संचालनालय) प्राप्त माहितीनुसार असे प्रमाणित करण्यात येते की,

a) मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाची राज्यामध्ये अंमलबजावणी करणेबाबत दिनांक ०१/०८/२०१९ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून यामध्ये अर्ज प्रक्रिया व प्रकल्प मंजूरी अंतर्गत करावयाची कार्यवाही, योजनेची अंमलबजावणी यंत्रणा, अनुदान वितरण व विविध मंजूरीस्तव समिती यांची

माहिती दिलेली आहे. तसेच दिनांक ११/११/२०२२ व दिनांक २१/०५/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर योजनेची व्याप्ती वाढविण्यात आली आहे.

b) यापूर्वी सदर योजनेअंतर्गत प्राप्त झालेला निधी प्राधिकृत बँकेत जमा करण्यात येवून सदर निधी बँकेमार्फत लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात येत आहे.

c) यापूर्वी वितरीत केलेल्या १००% निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.

d) वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षक/महालेखापाल यांच्याकडून कोणतेही आक्षेप नाहीत.

e) सदर निधी स्वीय प्रपंची लेखा अथवा बँक खात्यात जमा न करता खर्च केला जाणार आहे.

८. सदर प्रयोजनार्थ आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत होणारा खर्च "मागणी क्र.टी-५, २८५१-ग्रामोद्योग व लघु उद्योग, ००, ७९६-जनजाती क्षेत्र उपाययोजना, ०२-जनजाती क्षेत्राबाहेरील उपाययोजना, (०२) (०१) मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (राज्यस्तरीय योजना) (२८५१ ६६५४), ३१- सहायक अनुदाने (वेतनेत्तर)" या लेखाशिर्षाखालील सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात मंजूर केलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागविण्यात येईल. तसेच सदर प्रयोजनार्थ होणारा प्रत्यक्ष खर्च निधी वितरणाच्या अधीन राहून करण्याची दक्षता घेण्यात येईल.

९. सदर शासन निर्णय प्रशासकीय विभाग प्रमुख म्हणून प्रधान सचिव (उद्योग, गुंतवणूक व सेवा) यांना दिनांक २४/०७/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारांतर्गत निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदर शासन निर्णय वित्त विभाग व आदिवासी विकास विभागाच्या मान्यतेने (ई ऑफीस क्र.१७२५२१४ निर्गमित करण्यात येत आहे.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०२६०८२५१५३५००४६५२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AJIT TUKARAM SASULKAR

Digitally signed by AJIT TUKARAM SASULKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=09DF106C443B4977E7463338FA58F736FDB4FE137863B178345A5EAD34DBFB12, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=71214F99804ABAAE1EA28D5F794C1BA337889880D0C567C29D025934340956DF, cn=AJIT TUKARAM SASULKAR
Date: 2026.08.25 15:36:33 +05'30'

(अजित सासुलकर)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (उद्योग), उद्योग आयुक्तालय, मुंबई-३२.
२. आयुक्त (सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम), सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम आयुक्तालय, मुंबई-३२.
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई-९३.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
६. संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, मुंबई.
७. लेखा अधिकारी, सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम आयुक्तालय, मुंबई, नवीन प्रशासन भवन, मुंबई.
८. सर्व विभागीय सह आयुक्त (उद्योग व सेवा) (सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम आयुक्तालयामार्फत).
९. सर्व उप आयुक्त (उद्योग व सेवा), जिल्हा उद्योग केंद्र (सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम आयुक्तालयामार्फत).
१०. वित्त विभाग (कार्यासन व्यय-१६), मंत्रालय, मुंबई -३२.
११. आदिवासी विकास विभाग (कार्यासन ६), मंत्रालय, मुंबई-३२.
१२. कार्यासन अधिकारी (प्रशासन-१), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. निवड नस्ती (उद्योग-७).